FORM-1A

N.C.R.B. I.I.F.-I

OC

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0154191

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई Police Station, पहिली खबर क्र. 32 FIR No., वर्ष 2022 Year, दिनांक 19/07/2022 Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधि. 1988, कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act —, कलमे Sections —
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून 18/05/2022, वेळ 1100, तारीख पर्यंत 18/05/2022, वेळ 20:00
Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख 18/05/2022 Date, वेळ 14.00 Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 21/2022 General Diary Reference : Entry No., तारीख 19/07/2022 Date, वेळ 1340 Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस 09 कि.मी., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र.
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव विद्युत निरिक्षक कार्यालय चेंबूर, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव
Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण, गाव, पोस्ट, तालुका, जिल्हा, राज्य
Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव, तालुका, जिल्हा, राज्य
In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव सत्यवान कोल्हे Name
(b) वडिलांचे / पतीचे नाव शुंडिबा कोल्हे Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 39 Date of Birth and Age
(d) राष्ट्रीयत्व भारतीय Nationality, फोन नं. 7875160001 Phone No.
(e) पारपत्र क्रमांक — Passport No., दिल्याचा दिनांक — Date of Issue, दिल्याचे ठिकाण Place of Issue
(f) व्यवसाय इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste मराठा, जनजात Sub-Caste
(h) पत्ता मुंढवा, गल्ली / सर्व्हे नं. 41/44/सु / नाव नं., फोन / मो. नं., पॅन नं., वोटर्स नं.
Address : Ward, House/Name No., Phone/Mo. No., PAN No., Card No.
रस्त्याचे नाव केशवनगर रोड, जवळचे प्रसिद्ध ठिकाण, गाव मुंढवा, पोस्ट मुंढवा, पो. स्टे. मुंढवा
Road, Nearest identifiable place, Village, Post, P. Stn.
तालुका हवेली, जिल्हा पुणे, राज्य महाराष्ट्र, सध्याचा पत्ता वरीलप्रमाणे
Taluka, Dist., State, Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

सागर राठोड, विद्युत निरिक्षक - विद्युत निरिक्षक कार्यालय चेंबूर

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी श्री. सत्यवान गुंडीबा कोल्हे यांचा जबाब हा स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केला असून त्यास प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधिण्यात येत आहे.

समक्ष

(मनोज जिरगे)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Scanned with OKEN Scanner

श्री. सत्यावान गुंडीबा कोल्हे वय ३९ वर्षे, धंदा–इलेक्ट्रीक गुत्तेदारी, 41/A4/3 चैतन्य हॉटेल जवळ, केशव नगर, मुंढवा मांजरी रोड, मुंढवा ता. हवेली जिल्हा – पुणे.

मी, वरील ठिकाणी गेले चार वर्षापासुन माझे कुटुंबीयांसमवेत राहणेस आहे. सन २००० पासुन मी इलेक्ट्रीक गुत्तेदारी ची कामे त्यामधे ओपन प्लॉट मध्ये नवीन कनेक्शन घेणे, विद्युत रोहित्राची मंजुरी घेणे, त्यांची जोडणी करुन देणे अशा प्रकारची कामे विद्युत निरीक्षक परवानगीने खाजगी कंत्राट घेवुन करतो. अशा प्रकारची कामे करण्यासाठी मी विद्युत निरीक्षक कार्यालय, चेंबुर, मुंबई येथुन रितसर परवाना घेतलेला आहे. सदरची कामे ही मी पुणे व परिसरामध्ये करीत असतो. व त्यावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

माझे नातेवाईक श्री मोहित राजेद्र आटोळे रा. मु.पो.शिरसुफळ, महादेव मळा ता. बारामती जिल्हा – पुणे यांचे बी.ई. इलेक्ट्रीकलचे शिक्षण झाले असुन तोही इलेक्ट्रीकल वायरींगचे खाजगी कामे करतो. श्री मोहित आटोळे यालाही महावितरण कडुन कंत्राट घेवुन काम करण्याकरीता पर्यवेक्षक प्रमाणपत्राची आवश्यकता होती परंतु तो सध्या त्याचे कामामध्ये व्यस्त असल्याने त्यांनी मला त्याला परवाना काढुन देण्याकरीता मदत मागितली व तसे अधिकारपत्र दिले. तसेच परवाना काढण्यासाठी आवश्यक असणारा अर्ज व कागदपत्रांची छायांकीत प्रतींची एक फाईल मला दिली. त्यानुसार मी प्रथम विद्युत निरीक्षक कार्यालय, येरवडा, पुणे येथुन श्री आटोळे यांची फाईल प्रमाणपत्र मिळणेकरीता योग्य असल्याची मान्यता घेतली व पुढील परवानगी करीता विद्युत निरीक्षक कार्यालय,चेंबुर, मुंबई येथील आवक विभागामध्ये दि. १३/०५/२०२२ रोजी जमा केली व त्यानंतर मी संबंधीत विभागाचे अधिकारी श्री सागर राठोड यांना भेटलो असता, त्यांनी मला सांगीतले की, " सदरची फाईल माझ्याकडे येवु दे, मग आपण बोलु " त्यांचे बोलणे मला संशयास्पद वाटले.

त्यानंतर मी पुन्हा दि.१८/०५/२०२२ रोजी श्री राठोड साहेबांना भेटलो असता, त्यांनी मला सांगीतले की, सदरची फाईल क्लीअर करण्यासाठी तीस हजार रुपये खर्च येईल, त्यावेळी मी त्यांना कशाचा खर्च? कसला खर्च? असे विचारले असता त्यांनी मला अधीक माहिती दिली नाही व जाण्यास सांगीतले. मी ईतरांकडुन माहिती घेतली असता श्री राठोड यांनी मागितलेली रक्कम ही कोणतिही शासकीय फीस नाही, कामाची पुर्तता करुन घेण्यासाठी त्यांना द्यावी लागणारी लाचरक्कम असल्याचे समजले. सदर कामासाठी श्री राठोड यांना लाच देण्याची माझी ईच्छा नसल्याने मी त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी,मुंबई येथे श्री राठोड हे लाच मागत असलेबाबतची लेखी तक्रार दिली.

मी, दिलेल्या तक्रारी अन्वये दि. १९/०५/२०२२ रोजी दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान मी श्री राठोड साहेबांना भेटलो असता श्री राठोड साहेब यांनी माझेसोबत कामाविषयी चर्चा केली माझे सोबत असलेल्या व्यक्ती विषयी (पंचाविषयी )चौकशी केली. त्यावेळी मी त्यांना सांगीतले की, सदरचा व्यक्ती हा माझा मित्र आहे असे सांगीतले असता, श्री राठोड साहेब यांनी माझे मित्रास (पंचास) उद्येशुन तुम्ही **" जरा बाहेर थांबा "**... असे म्हणुन बाहेर जाण्यास सांगीतले. त्यानंतर श्री

Scanned with OKEN Scanner

राठोड साहेब यांनी माझ्याकडे पाहुन हाताने पैशाबाबतचा ईशारा करुन "बोला"...असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "तुम्हीच बोला" असे बोललो तेव्हा त्यांनी " हो ठीकय ठीकय "..... असे म्हणुन ते माझे कडे पाहु लागल्याने मी त्यांना विचारले किती देवु? त्यावेळी त्यांनी मला एक महिना असे उत्तर दिले. एक महिना म्हणजे किती तिस हजार का ? असे मी त्यांना विचारले असता राठोड साहेब यांनी "हाताने अंगठयाचा इशारा करुन ( थम्स अप ) हो.....द्या ...." असे म्हणुन पैशाची मागणी केली. सदरचे आमच्यातील संभाषण माझ्या सोबत असलेल्या व्हाईस रेकॉर्डर मधे ध्वनीमुद्रीत झाले आहे.

त्यानंतर मी, पंचासह खाली येवुन घडला प्रकार सापळा पथकास सांगीतला शासकीय नोकर श्री राठोड साहेब यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पण झाल्याने पो.नी. मनोज जिरगे यांनी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले. शासकीय नोकराने मागनी केलेल्या तीस हजार रुपये या लाच रकमेस अ‍ॅन्थ्रसीन पावडर लावुन सदरची रक्कम शासकीय नोकर श्री राठोड यांना देण्याकरीता मी पंचासह पुन्हा त्याचे कार्यालयात गेलो असता श्री राठोड साहेब हे काही कामानिमीत्त बाहेर गेले असल्याने त्यांची भेट झाली नाही. फोनव्दारे सायंकाळी सात वाजण्याचे सुमारास श्री राठोड साहेबांना संपर्क साधला असता त्यांनी सांगीतले की, "ते कामानिमीत्त बाहेर आहेत, आपली भेट आज होणार नाही तुम्ही मला नंतर येवुन भेटा." असे बोलुन त्यांनी फोन कट केला. त्यामुळे सदर दिवीशीची सापळा कार्यवाही स्थगीत केली.

तद्नंतर दि.२६/०५/२०२२ रोजी पुन्हा सापळा कार्यवाहीचे आयोजन केले, त्यादरम्यान मी श्री राठोड साहेब यांना पंचासह भेटलो असता, त्यांनी मला सांगीतले की, तुमचे प्रकरण पाठवलय पुढ.." तेव्हा मी त्यांना मग कधी भेटु ? असे विचारले असता त्यांनी सांगीतले की, दहा पंधरा दिवस लागतील,मी फोन करतो असे म्हणाले.सदरचे आमच्यातील संभाषण माझ्या सोबत असलेल्या व्हाईस रेकॉर्डर मधे ध्वनीमुद्रीत झाले आहे.

दि.०८/०६/२०२२ श्री आटोळे यांचे विद्युत पर्यवेक्षक प्रमाणपत्राची फाईल मंजुर होवुन पोस्टाव्दारे श्री आटोळे यांच्या राहत्या पत्त्यावर मिळाली. सदरचा परवाना हा सदरचे प्रमाणपत्र हे दिनांक १७/०५/२०२२ रोजीच मंजुर झाल्याची त्यावर तारीख आहे. असे असतानाही श्री राठोड यांनी मला दि. १८/०५/२०२२ रोजी फाईल पुढ पाठवली आहे, त्याकरीता तीस हजार रुपये खर्च येईल.. असे सांगुन माझ्याकडे पैशाची मागणी केली होती.

दि.२१/०६/२०२२ रोजी पुन्हा सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्यात आले, सदर कार्यवाही दरम्यान श्री राठोड यांनी मागणी केलेली रक्कम देण्याकरीता म्हणुन मी पुन्हा श्री राठोड यांना त्यांचे कार्यालयात जावुन पंचासह भेटलो, मी त्यांना मागील भेटीदरम्यान त्यांनी एक महिना देण्याबाबत सांगीतले होते.. असे मी त्यांना बोललो असता, त्यांनी त्वरीत **"कसल पेमेन्ट कसल"....** असे म्हणुन माझे बोलने टाळले. श्री राठोड साहेब यांना माझ्यावर संशय आल्याने त्यांनी माझ्याकडुन पैसे स्वीकारले नाहीत.

तरी शासकीय नोकर श्री सागर राठोड साहेब विद्युत निरीक्षक कार्यालय, चेंबुर, मुंबई यांनी माझे नातेवाईक श्री मोहित राजेंद्र आटोळे यांचा विद्युत पर्यवेक्षक प्रमाणपत्र

Scanned with OKEN Scanner

देण्याकरीता दि.१९/०५/२०२२ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान माझ्याकडे "एक महिना दे " असे सांकेतीक भाषेत बोलुन माझ्याकडे तीस हजार रुपये लाचेची मागणी केली आहे. परंतु त्यांना माझ्यावर संशय आल्याने त्यांनी माझ्याकडुन लाच रक्कम स्विाकरली नाही भविष्यामधे ते माझ्याकडुन पैसे स्वीकारतील असे वाटत नाही

माझा श्री. राठोड साहेब यांचेशी कोणताही आर्थीक देवाण—घेवाणीचा व्यवहार नाही किंवा त्यांचेशी कोणतेही वैर अथवा वाद नाही.

तरी शासकीय नोकर श्री सागर राठोड यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली म्हणुन आज रोजी मी त्याचे विरूध्द कायदेशीर तक्रार देत आहे.

माझा जबाब पो.नि. मनोज जिरगे यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचुन पाहिला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( मनोज जिरगे )
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

19-7-22

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारण फिर्यादी आज रोजी आल्याने.
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातिल फिर्यादी यांचेकडे, विद्युत परवाना असून विद्युत निरिक्षकांचे परवानगीने ते पुण्यातील नवीन बांधकाम व ओपन प्लॉटचे ठिकाणी इलेक्ट्रीक कनेक्शनची काम करतात. तक्रारदार यांचे नातेवाईक श्री मोहित आटोळे यांनाहि महावितरण कडून विद्युत कंत्राट घेवून काम करण्याकरीता पर्यवेक्षक प्रमाणपत्राची आवश्यकता होती. मोहित आटोळे हे व्यस्त असल्याने त्यांनी तक्रारदार यांना परवाना काढून देण्याकरिता अधिकारपत्र दिले होते. त्याप्रमाणे तक्रारदार हे विद्युत निरिक्षक कार्यालय, चेंबूर येथे सदर कामाची फाईल जमा करून संबंधीत अधिकारी श्री सागर शेंडे यांना भेटले असता विद्युत परवान्यासाठी सागर शेंडे यांनी ३० हजार रु लाचेची मागणी केली. म्हणून नमूद प्रमाणे गुन्हा दाखल.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन —, जिल्हा —, राज्य —

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to................................................ (3) Transferred to P. S. ............................................ District................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14-7-22

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name मनोज हिरालाल जिरगे
पदनाम Rank पोलिस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ....................
Posting
Code No. of I. O. ला.प्र.वि. मुंबई

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 20/07/2022
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

OC

Scanned with OKEN Scanner